सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल: cetcell@mahacet.org

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र.आस्था-१९१९/प्र.क्र.१४/दरपत्रक/सीईटी/९५७/२०२४ दिनांक - ०७ जून,२०२४

प्रति,

.............

.............

.............

विषय - शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेबाबत चर्चा व मार्गदर्शन करणे करिता शिक्षण संचालक, विद्यापीठाचे अधिष्ठाता आणि सर्व महाविद्यालयांचे संबंधित प्राचार्य यांच्यासोबत विभागिय परिसंवाद (Region-wise Seminars) कार्यक्रमाचे नियोजन करण्याबाबत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी माहे मार्च २०२४ ते मे २०२४ मध्ये सामाईक प्रवेश परीक्षा घेण्यात आल्या आहेत. सदर प्रवेश परीक्षांचे निकाल घोषित करण्याची प्रक्रिया सुरु असून तद्नंतर माहे जून २०२४ मध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेस सुरुवात होणार आहे.

त्याअनुषंगाने उमेदवाराच्या चुकीमुळे प्रवेश रद्द होणे, प्रवेश प्रक्रियेत तांत्रिक अडचण येणे महाविद्यालय स्तरावर प्रवेश प्रक्रिया राबविताना येणाऱ्या अडचणी, प्रवेश प्रक्रियेत सहभागी होणारे महाविद्यालयीन अधिकारी/ कर्मचारी यांना मार्गदर्शन तसेच प्रवेश प्रक्रियेनंतर प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे प्रवेश मंजूरी करीता करावयाच्या अर्जाची माहिती देणे इत्यादी विषयावर चर्चा व मार्गदर्शन करणे करिता शिक्षण संचालक, सहसंचालक, विभागीय संचालक तसेच संबंधित प्रशासकीय विभागातील महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाचे अधिष्ठाता यांचे सोबत मा.अध्यक्ष प्रवेश नियामक प्राधिकरण, प्रवेश नियामक प्राधिकरणाचे सदस्य, सचिव प्रवेश नियामक प्राधिकरण तसेच आयुक्त सीईटी कक्ष, परिक्षा समन्वयक, सहाय्यक परिक्षा समन्वयक यांचे समवेत विभागीय परिसंवाद आयोजित करण्याचे मा.अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सुचविले आहे.

त्यानुसार खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे प्रशासकीय विभागांमध्ये **विभागिय परिसंवाद** (Region-wise Seminars) कार्यक्रम आयोजन करण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

| अ.क्र | प्रशासकीय विभागांची नावे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **अमरावती** | **औरंगाबाद** | **कोकण** | **नागपूर** | **पुणे** | **नाशिक** |
| १ | बुलढाणा | जालना | ठाणे | वर्धा | सातारा | नंदुरबार |
| २ | अकोला | बीड | रायगड | चंद्रपुर | सांगली | धुळे |
| ३ | वाशिम | लातूर | रत्नागिरी | गडचिरोली | सोलापूर | जळगांव |
| ४ | यवतमाळ | उस्मानाबाद | सिंधुदुर्ग | गोंदिया | कोल्हापूर | अहमदनगर |
| ५ | | नांदेड | मुंबई | भंडारा | | |
| ६ | | हिंगोली | | | | |
| ७ | | परभणी | | | | |

तसेच या सेमिनार/बैठकांना उपस्थित राहण्यासाठी वैद्यकीय शिक्षण, आयुष, होमिओपॅथी, नर्सिंग/तांत्रिक शिक्षण/कृषी/उच्च शिक्षण/कला इ.च्या सर्व संचालकांना सूचना जारी करण्याबाबत आणि प्रनिप्रा सदस्यांना (अधिकृत) निमंत्रित करण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत **विभागिय परिसंवाद** (Region-wise Seminars) कार्यक्रम आयोजित करण्यासाठी उपरोक्त विभागनिहाय प्रवास (लोकल/विमान/खाजगी वाहन), निवासव्यवस्था व रिफ्रेशमेंट सुविधा(ब्रेकफास्ट, लंच, डिनर), कार्यक्रमासाठी नियोजित ठिकाणी जागा व इतर आवश्यक सामुग्री , गुगल फॉर्म रजिस्ट्रेशन अँड हेल्पडेस्क, एलईडी स्क्रीन तसेच सदर कार्यक्रमाबाबत स्थानिक ठिकाणी प्रसिध्दीसाठी जाहिरात व प्रिंटींग इ.बाबींसाठी दरपत्रक प्रक्रियेद्वारे सेवा पुरविण्याबाबत सेवा पुरवठादार निश्चित करण्यासाठी खुल्या बाजारातून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुक सेवा पुरवठादार यांच्यामार्फत उपरोक्त नमुद केल्यानुसार दरपत्रक सीलबंद लिफाफ्यात दिनांक २१ जून २०२४ रोजी दुपारी ०१ वाजेपर्यंत सादर करावीत. सदर दिनांकानंतर प्राप्त होणारी दर प्रक्रियेसाठी विचारात घेतली जाणार नाहीत.

सही/-
आयुक्त
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई